# कलेक्टर साहेब, बीड जिल्ह्यातील शस्त्र परवान्याबाबत दुजाभाव का?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
**आरंभ**
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564






■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २०० ■ मंगळवार दि.८ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 200 ■ Tuesday Dt.8 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# कोणाचा निलंबित तर कोणाचा रद्द, याला अभय कोणाचे?

## राजकीय नेत्यांचे शस्त्र परवाने रद्द करण्याऐवजी निलंबित करून त्यांना पळवाट

### उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्यासमोर मात्र प्रशासनाने शस्त्र परवाने रद्द केल्याचा दावा केला होता

### जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी पाळवाट का काढली; जिल्हाधिकारी वादात सापडण्याची शक्यता?

### जिल्हाधिकारी पाठक यांनी निलंबित आणि रद्द यांच्याबाबतीत नियम काय लावले?




बीड । प्रतिनिधी

मयत, वयोवृद्ध अशा लोकांचे शस्त्र परवाना रद्द करण्यात आले आहेत. तसेच गुन्हे दाखल असलेल्या काही लोकांचेही रद्द केले. परंतु, मोजक्या काही राजकीय नेत्यांचे परवाने रद्दऐवजी निलंबित करून त्यांना पळवाट देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर मात्र प्रशासनाने रद्द केल्याचा दावा केला, तो पवार यांनी माध्यमांना सांगितले. परंतु, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी हे परवाने रद्द करताना दुजाभाव केल्याचे दिसत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी वादात सापडण्याची शक्यता आहे.



बीड जिल्ह्यातील १२८१ लोकांकडे शस्त्र परवाना होता. काही लोक जिल्ह्याबाहेर वास्तव्यास होते तर काही लोक मयत असतानाही त्यांच्या नावावर परवाना होता. काही लोकांवर गुन्हे दाखल असतानाही त्यांच्याकडे शस्त्र परवाना असल्याचे समोर आले होते. पोलिस अधीक्षकांनी याची यादी तयार करून ती जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवली. त्यानंतर त्यांनी नोटीस बजावल्या. त्याप्रमाणे आतापर्यंत ३४० शस्त्र परवाने रद्द, निलंबित, सरेंडर करण्यात आले आहेत. परंतु, शस्त्र परवान्याबाबत कारवाया करताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी काही लोकांना पळवाट दिल्याचे समोर आले आहे. काही लोकांवर गुन्हे दाखल असतानाही त्यांचे परवाने रद्द केले, तर काही लोकांचे केवळ निलंबित करण्यात आले आहेत. भविष्यात अर्ज करून ते नियमित करता येऊ शकतात, असे एका अधिकाऱ्याने खासगीत सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांनी ही पळवाट का काढली? असा प्रश्न आहे.

### निलंबित, रद्दचे नियम काय?

गुन्हा दाखल असलेल्या काही लोकांचे शस्त्र परवाने रद्द करण्यात आले आहेत. परंतु, अशाच प्रकारे काहींचे निलंबित करण्यात आले आहेत. ३४० मधील ६५ लोकांचा यात समावेश आहे. परंतु, जिल्हाधिकारी पाठक यांनी निलंबित आणि रद्द यांच्याबाबतीत नियम काय लावले? हे मात्र समजू शकले नाही. जिल्हाधिकारी अविनाश पाठक, आरडीसी शिवशंकर स्वामी यांच्याशी संपर्क केला, परंतु दोघांचेही फोन बंद होते, त्यामुळे त्यांची बाजू समजली नाही.

### इतर परवान्यांवर कधी निर्णय?

राज्यात सर्वांत जास्त शस्त्र परवाने बीडमधूनच वाटल्याचे समोर आले होते. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी चार दिवसांपूर्वी याचा आढावा घेतला. माध्यमांशी बोलताना त्यांनी ३४० परवाने रद्द केल्याचे सांगितले. तसेच उर्वरित परवान्यांबाबतही लवकरच कारवाई करू, असे सांगितले होते. परंतु, सध्या तरी पोलिस आणि जिल्हा प्रशासनाकडून यावर काहीच पावले उचलली जात नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

### सहकार, सामाजिक, राजकीय लोकांचा समावेश

जे ६५ परवाने निलंबित केले आहेत, अशांमध्ये राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, सहकार क्षेत्रातील व्यक्ती आदींचा समावेश आहे. हे धनदांडगे असल्यानेच त्यांना रद्दऐवजी निलंबनाची पळवाट दिल्याचे सांगण्यात आले.

## मनसेची मान्यता रद्द करावी

### सुनील शुक्लांची सर्वोच्च न्यायालयात याचिका



मुंबई । प्रतिनिधी

राज ठाकरे आणि मनसेविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. उत्तर भारतीयांविरोधात राज ठाकरे तिरस्कार पसरवत असून त्यांच्या पक्षाची मान्यता रद्द करण्यात यावी अशी मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. उत्तर भारतीय विकाससेना नामक पक्षाच्या सुनील शुल्कांनी ही याचिका दाखल केली आहे. सुनील शुक्ला मुंबईचेच रहिवासी असून त्यांच्या पक्षाच्या कार्यालयावर गेल्या वर्षी मनसेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केल्याचा आरोप आहे.

उत्तर भारतीयांविरोधात राज ठाकरे हिंसेला पाठिंबा देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. राज ठाकरेंविरोधात तक्रार दाखल करून पक्षाची मान्यता रद्द करा. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात राज्य सरकारला तसे आदेस द्यावेत अशी मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे.

दरम्यान, मनसे कार्यकर्त्यांनी आपल्याला धमकी दिल्याची तक्रार सुनील शुक्ला यांनी पोलिसात केली आहे. मनसे कार्यकर्त्यांकडून फोन करून आणि सोशल मीडियावरून धमक्या दिल्याची तक्रार त्यांनी केली आहे.


▶ पान २ वर


## मोटारसायकल अपघातात दोन ठार

नेकनूर । प्रतिनिधी

भरधाव मोटारसायकल आणि अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटारसायकलवरील दोघांचा मृत्यू झाला असून अन्य एक गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात नेकनूर–वेळबघाट रोडवर काल रात्री घडला. दरम्यान नेकनूर येथून गॅरेजमधील काम आटोपून गावाकडे जात असलेल्या मोटारसायकलस्वाराला लिफ्ट मागितली आणि काळाने त्यांच्यावर झडप घातली. या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत असुन येळंबधाट गावावर शोककळा पसरली आहे.



मयत गणेश घरत | मयत अफजल पठाण

बीड तालुक्यातील नेकनूर देथील गॅरेजमध्ये शिकाऊ काम करत असलेला पठाण अफजल पठाण अमजद (वय १६ रा. वेळबघाट ता. बीड) हा काल रात्री काम आटोपून गावाकडे निघाला होता. त्याचवेळी गणेश श्रीधर घरत (वय २९ रा. येळ बघाट) हा मोटारसायकल क्रमांक एम.एच.२३ बी.डी.९८९६ वरून गावाकडे जात असतांना पठाण अफजल बाने घरतला लिफ्ट मागितली. यावेळी घरत यांच्यासोबत मित्र बाबा कांबळे (वय ३८ रा. येळंबघाट) हे पाठीमागे बसले होते. पठाण अफजल याने लिफ्ट मागितल्याने घरत यांनी कांबळे याच्यासह पठाणलाही आपल्या मोटारसायकलवर घेतले. गावाजवळ पोहचताच घरत यांच्या मोटारसायकलची आणि अज्ञात बाहनाची पडक झाली. या घडकेत मोटारसायकलवरील तिघेही रस्त्यावर फेकले गेले. अपघातात गणेश घरत यांचा जागीच मृत्यू झाला तर अफजल पठाण आणि बाबा कांबळे हे गंभीर जखमी झाले. त्यांना बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतांनाच पठाण अफजल याचा मृत्यू झाला. कांबळे याच्याबर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती कळताच नेकनूर पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरूध्द गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पो. कॉ. रतन निगुळे व उबाळे करत आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रभावशाली अर्थतज्ज्ञ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधानाचे शिल्पकार, एक अत्यंत महत्त्वाचे अर्थतज्ज्ञ होते आणि त्यांच्या विचारांनी भारताच्या अर्थव्यवस्थेवर खोल प्रभाव केला आहे. त्यांच्या कामामध्ये प्रॉब्लेम ऑफ रुपी या ग्रंथाचे विशेष महत्त्व आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी भारतीय चलन व्यवस्थेच्या विविध पैलूंवर सखोल विचार केले, जो भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरला.

प्रॉब्लेम ऑफ रुपी ग्रंथातील महत्त्वाचे मुद्दे:

१ चलनाचे महत्व : आंबेडकर यांनी रुपयाविषयी चर्चा केली आहे, ज्या अंतर्गत त्यांनी भारतीय रुपयाच्या स्थिरतेचा संदर्भ दिला आहे. त्यांच्या विचारानुसार, चलनाची स्थिरता अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे.

२ बँकिंग प्रणाली : आंबेडकर यांनी बँकिंग प्रणालीच्या गरजेसाठी जोरदार वकिली करून, केंद्रीय बँक (या संदर्भात रिझर्व बँक ऑफ इंडिया) स्थापन करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यांनी म्हणजे बँकांच्या निगडित आर्थिक नियंत्रणामुळे चलन व्यवस्थापनात स्थिरता येते, हे स्पष्ट केले.


३. आर्थिक धोरणे : त्यांनी अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या आर्थिक धोरणांचा अभ्यास केला. त्यांचा विश्वास होता की एक स्वतंत्र आणि शक्तिशाली केंद्रीय बँक अर्थव्यवस्थेच्या स्थिरतेसाठी आवश्यक आहे.

४. रिझर्व बँक ऑफ इंडिया ची स्थापना:

स्थापन: १ एप्रिल १९३५ रोजी रिझर्व बँक ऑफ इंडिया स्थापन करण्यात आली.– उद्दीष्ट: या बँकेचे प्राथमिक उद्दिष्ट भारतीय रुपयाचे नियंत्रण आणि चालना देणे होते, ज्यामुळे देशात आर्थिक स्थिरता निर्माण होईल. महत्त्व: रिझर्व बँकाने चलनाचे व्यवस्थापन, व्याज दर धोरण, आणि अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास यासाठी महत्त्वाची भूमिका निभावली.

निष्कर्ष: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रॉब्लेम ऑफ रुपी यासारखे कार्य आर्थिक आधारस्तंभ प्रदान करणारे ठरले. त्यांच्या विचारांना आधारभूत होऊन रिझर्व बँक ऑफ इंडिया ने भारतीय अर्थव्यवस्थेच्या व्यवस्थापनात क्रांतिकारी बदल केले. आंबेडकर यांचे विचार, विशेषतः चलन व्यवस्थापन संदर्भात, आजही महत्त्वाचे मानले जातात, ज्यामुळे त्यांच्या योगदानाची महत्ता अधोरेखीत होते.

**बालाजी जगतकर बीड,**
**संपर्क क्र.– ९९६०१७४५९७**






# येत्या गुरुवारी १० एप्रिल रोजी बीड जिल्हा शाश्वत विकास मंथन बैठक

बीड । प्रतिनिधी

ए एम २०३२ बीड लाईव्ह (अप्रतिम महावक्ता – पब्लिक टॅलेंट रियालिटी शो सिरीज २०३२ शाश्वत विकास ध्येयाच्या दिशेने') या पत्रकारांच्या पुढाकारातून राबवयाच्या कार्यक्रम मालिकेअंतर्गत साहित्यिका व सामाजिक कार्यकर्त्या डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली आणि अविनाश पाठक, जिल्हाधिकारी सचिन पांडकर, अप्पर पोलीस अधीक्षक बीड यांच्या प्रमुख उपस्थितीत 'बीड जिल्हा शाश्वत विकास मंथन बैठकीचे' दिनांक १० एप्रिल २०२५ गुरुवार रोजी सकाळी १० वाजता, के एस के कॉलेज येथे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील राजकीय, शासकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, पर्यावरण, उद्योग व्यापार यासह विविध क्षेत्रातील संस्था तसेच युवा वर्ग, महिला संघटना व नागरिकांच्या सांघिक सहकार्यातून प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व नव माध्यमातील पत्रकार आगामी काळासाठी विशेष उपक्रम राबविणार आहेत. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्थातच राजकीय व सर्व क्षेत्रातील सामाजिक संस्थांचा आणि मुख्य म्हणजे शासकीय, निम शासकीय अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. बैठकीमध्ये ज्येष्ठ पत्रकार डॉ. अनिल फळे हे सदर




कार्यक्रम मालिकेबद्दल सादरीकरण करतील. त्या सादरीकरणाच्या अनुषंगाने आपल्या सूचना व सहकार्य लक्षात घेऊन बीड शहर व जिल्ह्यामध्ये विविध कार्यक्रम राबविले जातील; त्यासंबंधी आपल्या सूचना, सहकार्य व मार्गदर्शन आवश्यक आहे. या बैठकीसाठी संबंधितांनी अवश्य उपस्थित राहावे, असे आवाहन दिलीप खिस्ती संयोजक, विशाल साळुंके समन्वयक, अनिल जाधव समन्वयक आणि विविध संपादक, पत्रकार संघटना सदस्यांनी केले आहे.

पान १ वरून...

## मनसेची मान्यता रद्द करावी...

**मनसेचा भाजपवर आरोप**

दरम्यान, शुक्लांच्या याचिकेनंतर मनसेचे मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे यांनी भाजपवर आरोप केले आहेत. प्रादेशिक पक्ष वाढू नयेत म्हणून हे भाजपचंच षडयंत्र आहे, असं देशपांडे म्हणाले. याआधी हा आरोप ठाकरेंच्या शिवसेनेनं अनेकदा केला आहे. मात्र आता राज ठाकरेंची मनसे देखील असाच आरोप करू लागली आहे. मात्र संदीप देशपांडे यांनी केलेले हे आरोप भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी फेटाळले आहेत.

**संजय निरुपमांची मनसेवर टीका**

शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय निरुपम यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, मनसे मराठी भाषेचा आग्रह ठेवतो यात गैर काही नाही. मनसे जी गुंडगिरी दाखवत आहे ते चुकीचं आहे. मनसेच्या गुंड कार्यकर्त्यांवर कारवाई झालीच पाहिजे. मनसेची आंदोलन करण्याची पद्धत चुकीची आहे. शहरात नवीन आलेल्यांना मारहाण करणं हे चुकीचं आहे. त्यामुळे मनसेने आता कोर्टाच्या निर्णयाला सामोरं जाण्याची तयारी ठेवावी.

**मराठी वि. हिंदी वाद**

राज्यात, विशेषतः मुंबईत मराठी विरुद्ध हिंदी असा वाद वाढताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबईत मराठी न बोलता हिंदी बोलण्याची सक्ती काहींजणांकडून केली जात आहे. तसेच मराठी व्यक्तीला नोकऱ्यांमधून डावलण्यात येत आहे. त्याविरोधात मनसेने कडक भूमिका घेतली आहे. गुढीपाडव्याच्या मेळाव्याच्या भाषणामध्येही राज ठाकरेंनी मराठीच्या मुद्द्यावरून इशारा दिला होता.

# प्रताप समिंदरसवळे उभारता युवा नेता : राज जगतकर

एक काळ असा होता भीम नगर या परिसरामध्ये कबड्डीच्या खेळनेअनेक लोकांना वेड लावलेले होते या वेडापाई आपली गरिबीची परिस्थिती असली तरी कबड्डीच्या खेळामध्ये नैपुण्य मिळवणारे अनेक खेळाडू या परिसरामध्ये निर्माण झाली तो काळ हा दलित समाजाच्या परिवर्तनाचा व अन्याय अत्याचाराविरुद्ध लढण्याचा व संघर्ष करण्याचाकाळ होता त्याच कालखंडामध्ये दलित पँथर नावाचं वादळ भारत देशामध्ये घोंगावत होते दलित समाजामध्ये आलेली मरगळझटकून या चळवळीने दलित माणसाला जागृत करण्याचं काम केलं या चळवळीने दलित समाजामधील स्वाभिमान जागृत करून अन्याय अत्याचार विरुद्ध लढण्याचं बळ या चळवळीने दिले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेने पीडित समाज परिवर्तनाच्या लढाईमध्ये अनेक युवक तन–मन धनाने या चळवळीमध्ये सहभागी झालेले होते. येथील समाज व्यवस्थेने धर्माच्या नावावर जातीच्या नावावर अनादी काळापासून दलित समाजावर केलेले अन्याय अत्याचारवृत्त लढण्यासाठी तिचं बळ देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार झालेला लोकांनी उराशी कवटाळून येथील जातीयवाद धर्मवाद मातीत काढण्यासाठी पुढाकार घेतला होता त्यामध्ये अनेक युवक सहभागी झाले होते त्यामध्ये अग्रणी नाव असलेले आदरणीय सूर्यकांत समिंदर साबळे अत्यंत गरिबीच्या परिस्थितीमध्ये जीवन जगणारा अठरा विश्व दारिद्र्य आपल्या बाजूला पोचलेले असली तरी पोटाची खळगी भरण्यासाठी अनेक व्यवसाय त्यांनी केले न ला असताना संकुचिता त्यांनी आपला प्रपंच भागवण्यासाठी अनेक व्यवसाय केले त्यांना लहानपणापासूनच कबड्डी या खेळाचे फार मोठा आकर्षण होतं कबड्डी या खेळामध्ये त्यांनी आपल्या अथक परिश्रमाच्या जोरावर अनेक क्रीडा स्पर्धा गाजवलेल्या आहेत भीम नगर परिसरामध्ये त्यांनी त्या कालखंडामध्ये अनेक युवकांना कबड्डी या खेळामध्ये आवड निर्माण होते म्हणून अनेक उपक्रम राबवण्याचे काम केले कबड्डी या खेळाने त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आपली नाळ ही डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधारेचे आहे हे ओळखून त्यांनी या समाज परिवर्तनाच्या लढाईमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून समाज परिवर्तनाच्या लढाईमध्ये आपला खारीचा वाटा त्यांनी या समाजाला दिलेला आहे जरी आपली गरिबीची परिस्थिती असली तरी आपण या समाजाला योगदान देऊ शकतो हा मंत्र त्यांनी समाजाला दिला आपल्या वडिलांनी जहाल अपेक्षा सहन केल्या आपल्या वडिलांनी जी गरिबी पाहिली ती आपल्या पुढच्या पिढीला येऊ नये म्हणून



आदरणीय सूर्यकांत जी समिंदर साबळे यांच्या मुलांनी अथक परिसरातून स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःचे अस्तित्व निर्माण केलं व आपल्या वडिलांनी जो समाज परिवर्तनाचा परत पुढे नेण्याचे काम केले. परत आपणही पुढे नेण्याचं काम केलं पाहिजे म्हणून समाज परिवर्तनाच्या लढाईमध्ये आपापल्या पद्धतीने सहकार्य करणारी त्यांची तिन्ही मुले ही समाजाला फुले आंबेडकरी चळवळीला योगदान देण्याचे काम करत आहेत.

आदरणीय प्रताप समिंदरसवळे यांनी आपल्या वाढ वडिलांचा वारसा पुढे चालू ठेवून आपलं संपूर्ण आयुष्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार झालेला समर्पित केलेले आहे ज्या ज्या ठिकाणी दलित माणसांवर अन्याय अत्याचार होत असेल त्यांनी अत्याचाराला प्रत्युत्तर देण्यासाठी पुढाकार घेण्याचं काम करणारा येथील सर्वसामान्य दलित माणसांना पुढेयावं म्हणून या समाजातील वंचित घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी सदैव पुढाकार घेणारा भोजन समाजातील गरीब लोकांच्या लेकरांनी शिक्षण घ्यावे म्हणून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपल्या लहान भाऊ सुनील समिंदर सवळे यांच्यामार्फत बहुजन समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रगती करावी म्हणून त्यांचे फ्री ऑफ कास्ट मध्ये शैक्षणिक क्लासेस घेऊन त्यांना शैक्षणिक दृष्ट्या सबल करण्यासाठी प्रयत्नशील असलेला अनेक माणसांनी गरिबीच्या परिस्थितीवर मात करून आपल्या अथक परिश्रमातून यशाची शिखरे गाठलेली आहेत अशा अनेक बहुजन समाजातील लोकांचा सत्कार घेऊन त्यांनी भविष्यामध्ये समाजासाठी योगदान द्यावे म्हणून त्यांना प्रोत्साहन देणे गोरगरिबांच्या लेकरांना शैक्षणिक कार्यात आर्थिक मदत करणे त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणे सामाजिक आर्थिक सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रामध्ये दलित समाजाने प्रगती करावी म्हणून अनेक प्रकारची उपक्रम राबवण्याचे काम करणारी आपल्या जीवनात सोनं करायचं असेल प्रत्येक माणसाने शिक्षणाकडे वळलं पाहिजे.

उद्योग धंद्याकडे वळला पाहिजे बँकिंग क्षेत्राकडे वळला पाहिजे म्हणून आपल्याला ज्या आवडीनिवडी आहेत त्यावरील निवडीनुसार आपण त्या उद्योगधंद्याकडे वळून आपल्या जीवनाच सोनं करण्याचं काम केलं पाहिजे या मताचा असलेला बँकिंग क्षेत्रामध्ये आपण अनेक लोकांचे कल्याण करू शकतो अनेक लोकांना आपण अर्थसहाय्य करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करू शकतो हा मंत्र आत्मसात करून त्यांनी बँकिंग क्षेत्रामध्ये पदार्पण करून अनेक लोकांना त्यांच्या अंधाकारमय जीवनाला प्रकाशमय करण्याचं काम सुरू केलेलं आहे जोपर्यंत तुम्ही आर्थिक दृष्ट्या परिपूर्ण होत नाहीत तोपर्यंत तुम्ही दुसऱ्यांना मदत करू शकत नाहीत म्हणून प्रत्येक माणसाने सर्वप्रथम आर्थिक दृष्ट्या सबल झालं पाहिजे स्वतः आपण आपल्या पायावर थांबलात की आपण अनेक लोकांना त्यांच्या पायाभूत करू शकतो म्हणून प्रत्येक माणसाने सर्वप्रथम आपण परिपूर्ण झाले पाहिजे त्यानंतर समाजाला परिपूर्ण करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत या मताचा असलेला अत्यंत शांत संयमी स्वभावाचा प्रत्येक माणसाला मदत कशा पद्धतीने करता येईल यासाठी सक्रिय असलेला सामाजिक कार्यामध्ये सदैव सक्रिय असलेला गोरगरीब माणसांच्या हितासाठी हक्कासाठी सदैव लढण्याचे काम करणारा ज्यांच्या पाचवीला संघर्ष बदलेला आहे ज्यांच्या आई–वडिलांनी हालाखीच्या परिस्थितीवर मात करून या लेकरांना आज घडवलं त्याची जाणीव ठेवून या समाज परिवर्तनाच्या लढाईमध्ये आपण पुढे आलं पाहिजे या मताचा असलेला फुले आंबेडकरी चळवळीचा एक कट्टर अनुयायी सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत चे साहित्य करणारा फुले आंबेडकर चळवळीला आपलं सर्वस्व अर्पण करणारा सामाजिक प्रश्नाची जाण असलेला गरीबीची जाण असलेला हसरमुख की यांच्या बद्दल जिव्हाळा प्रेम आपुलकी असलेला प्रत्येक माणसाला आपला जवळचा कोणीतरी आहे याची जाणीव करून देणारा आदरणीय प्रताप समिंदरसावळे यांना त्यांच्यावाढदिवसानिमित्त कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा जय भीम जय भारत....

## श्री संत भगवानबाबा यांनी प्रारंभ केलेल्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहाचे स्वरूप, व्याप्ती व महती याविषयी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांनी लिहिलेला विशेष लेख

# श्री क्षेत्र भगवानगडाचा ९१ वा नारळी सप्ताह

संत–महापुरुषांचं एकत्रीकरण म्हणजे अखंड हरिनाम सप्ताह. विचारांची देवाणघेवाण, तत्त्वज्ञानावर चर्चासत्र, अनेक महापुरुषांना अभिप्राय व्यक्त करण्याचे व्यासपीठ. सामान्यांचे एकत्रीकरण, एकत्र जेवण, निर्व्यसनीपणाचे प्रशिक्षण, जीवनाविषयीची गंभीरता, ईश्वराविषयी प्रेम, जीवन व संसाराची अनित्यता, सुख दुःखाची जाण, स्वतःविषयीचे ज्ञान व जगण्याचे भान देणारा हा अखंड हरिनाम सप्ताह असतो. संतांच्या ग्रंथांमधील न समजणारे सिद्धांत इथे समजून सांगितले जातात. भारताचा इतिहास व संस्कृतीचे विवेचन केले जाते. ऋषींचं मत व साधूंचं मनोगत इथे आचरणात आणण्याचे शिकविले जाते. आरोग्याची काळजी व योगप्रशिक्षण यात दिलं जातं. देव, भक्त व नाम ही त्रिवेणी म्हणजे नामसप्ताह होय. इथे वाल्याचा महर्षी वाल्मीक होतो. हीच संतांची प्रतिज्ञाही आहे.

सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे अधिकाराप्रमाणे प्रत्येकाला आचरणाची मुभा दिली जाते. जात, पात, धर्म हे वारकरी संप्रदायात पहिल्यापासून नाहीत. इथे जो देवावर प्रेम करतो, तीच एक जात मानली जाते. स्त्री आणि पुरुष हा भेद नाही. इथे कोणत्याही अभंगावर विश्लेषणे होतात. संत सावता महाराज, संत चोखोबाराय, संत सेना महाराज, संत गोरोबाकाका, संत नरहरी महाराज, संत नामदेव महाराज, संत लतीप शाह, सजन कसाई इत्यादी सर्व संतवृंद एकतत्वाचे व एकमताचे आहेत. त्यांचा धर्म व जात कोणती आहे, हे पाहिलं जात नाही. नैतिक आचरण, त्याग व ईश्वराविषयी प्रेम हेच सिद्धांत महत्त्वाचे आहेत. धर्मांधता नको; पण अंतःकरण मोठं पाहिजे. उदारता पाहिजे. दिखाऊ प्रेम नको, देखणं प्रेम पाहिजे. त्याग हा बोलण्यात नव्हे तर वागण्यात दिसला पाहिजे. स्वतःचं अस्तित्व वाढविण्यासाठी हा सप्ताह नाही. अर्थात संप्रदायाचा, संतांच्या विचारांचा प्रचार व प्रसार यासाठी हा नामसप्ताह असतो. चांगल्याचा चांगल्यासाठी मेळावा आहे. या संतसभेत जर संतांपुढे गीता सांगण्याचा योग आला, तर त्याला ईश्वर साक्षात्कार होतो. साक्षात्कारापेक्षाही तो देवाचा आवडता होतो.

तैसा भूतळी आघवा श्र आन न देखे पांडवा श्रश्र जो गीता सांगे मेळावा श्र भक्तजनांचा श्रश्र
मग तयाचेनि पाडे श्र पडियंते मजपुढे श्रश्र नाहीचि गा मागेपुढे श्र न्याहाळीता श्रश्र


हा सप्ताह विधिपूर्वक होत असतो. पहाटे काकडा भजन असते. हे अभंग स्वतंत्र आहेत. या अभंगाला काकड्याचे अभंग व भूपाळ्या असे नाव आहे. या अभंगात जीवनाचे व भगवंताचे विशिष्ट पद्धतीचे वर्णन वेगळ्या छंदातून व चालीतून असते. पहाटे मन शांत असताना कोणता विचार मनात असावा, हा विचार करून हे अभंग तयार झाले आहेत. यानंतर सर्वांसाठी ज्ञानेश्वरी पारायण. साधारणतः पंधराशे ओव्या तीन तासांत व्हाव्यात. थोडा अल्पोपहार व नंतर गाथा भजन. हे गाथाभजन फार शांत पध्दतीने करायचे असते. इथे गाण्याला कमी महत्व असते. अभंग हे खोलवर रुजले पाहिजेत, एवढ्याच प्रमाणात संगीत असते. भजनाच्या अंतिम टप्प्यात विशिष्ट पद्धतीने नृत्य असते. या नृत्याला 'पाऊल्या' असे म्हणतात. यात नृत्याचे अनेक प्रकार आहेत. मृदंगाच्या साक्षीने, टाळांच्या गजरात भगवंताचे नामचिंतन करीत तालात 'कोट' आदी खेळले जातात. यातच फुगडी, प्रतिस्पर्धात्मक खेळ, खो–खो, घुमरी आदी खेळ रंगतात. जेवण आणि थोड्या विश्रांतीनंतर ज्ञानेश्वरी प्रवचन, भागवत किंवा रामायण इत्यादी निरुपणे होतात. हरिपाठ, जेवण, रात्री कीर्तन व कीर्तनांतर हरिजागर होतो. हे एक अध्यात्मिक शिबिरच असते. सतत संसाराचा विचार करणारं मन थोडं तत्वज्ञानाकडे वळतं. आपण का जन्माला आलो ? आपलं काय कर्तव्य आहे ? याची जाणीव निर्माण होते. कोणत्या सिद्धांतावर आपण विचार करावा, हे या सप्ताहात आपल्याला कळतं. अचानक जीवनाला धोका झाला, तर मनुष्याचा मानसिक तोल जाऊ शकतो. दुःखाची तीव्रता अधिक होऊ शकते. हेच जर संतसंगतीतून अगोदर कळलं तर मनुष्य सावध होतो.

नाशिवंत देह जाणार सकळ श्र
आयुष्य खातो काळ सावधान

सज्जनांचा मेळावा असणारा हा सत्संग सर्वांसाठी लाभदायक आहे. सर्वांची एकता साधणारा, जगण्याचं भान देणारा, मनुष्याला सन्मार्ग दाखविणारा असा हा नामसप्ताह असतो. हा अध्यात्मिक उत्सव महाराष्ट्रात सर्वत्र साजरा करतात. सर्व संतांचं अनुमोदन असून, सर्व फडकरी, मठकरी, संस्थानिक हा उपक्रम राबवतात. मराठवाड्यात श्री संत भगवानबाबांनी नारळी सप्ताह प्रारंभ केला. परिसरातील सर्व गावांनी सात दिवस एका गावात एकत्रित यायचं. सप्ताहाचं गांव दरवर्षी बदलत असतं. ज्या गावाला हा सप्ताह करायचा असेल, त्यांनी नारळाची मागणी करायची. त्याचं वर्ष ठरवून तो नारळ दिला जातो, म्हणून या अखंड हरिनाम सप्ताहाला 'नारळी सप्ताह' म्हणतात. चैत्र शुद्ध त्रयोदशी ही सप्ताहाच्या प्रारंभाची तिथी ठरलेली असते. आज या सप्ताहाचं स्वरुप फार विराट झालं आहे.

संपूर्ण महाराष्ट्रातून विद्वान व भक्त मंडळी या सप्ताहासाठी मोठ्या प्रमाणात येतात. त्यांच्या जेवणाची सोय ज्या गावाने नारळ घेतलेला असतो ते गांवकरी करतात. त्या गावाला परिसरातील गांवकरी पूर्ण सहकार्य करतात. यावर्षी तालुक्यातील मौजे पिंपळनेर (ता.शिरूर, जि.बीड) येथे दि. १० ते १७ एप्रिल दरम्यान हा नारळी सप्ताह संपन्न होत आहे. श्री संत भगवानबाबांनी तुमच्या–आमच्यासाठी सुरु केलेल्या या ज्ञानयज्ञ सोहळ्याचा आपण प्रत्यक्ष अनुभव घ्यावा.

फोडिले भांडार धन्याचा हा माल श्र
तेथे मी हमाल भारवाही श्रश्र (तुकाराम गाथा– ३३५)



## मा.आमदार केशवदादा आंधळे यांच्या दूरदृष्टी संकल्पनेतून निर्माण झालेला उर्ध्व कुंडलिका प्रकल्प वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी ठरतोय वरदान

# भरउन्हाळ्यात वडवणीकरांची भागवतोय तहान



वडवणी (प्रतिनिधी):- वडवणी तालुक्यातील डोंगरपट्ट्यात असलेल्या रुई (पिंपळा) या छोट्याशा खेडेगावात ०६ एप्रिल १९५३ रोजी एका सर्वसामान्य कष्टकरी शेतकऱ्यांच्या कुटुंबात केशवदादांचा जन्म झाला.रुई (पिंपळा) व चारदरी या मामाच्या गावामध्ये प्राथमिक शिक्षण घेतले तर महाविद्यालयीन शिक्षण बीड येथील,बलभीम महाविद्यालयातून पूर्ण केले त्यावेळी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे दोन गट होते एक ग्रामीण व दुसरा शहरी ग्रामीण विद्यार्थ्यांवर शहरातील विद्यार्थी अन्याय करायचे हा अन्याय थांबवण्यासाठी केशवदादांनी महाविद्यालयातील विद्यार्थी प्रतिनिधी सीआर ची निवडणूक लढवली शहरी व ग्रामीण दोन्हीही गटातील विद्यार्थी केशवदादांचे मित्र असल्यामुळे केशवदादांनी ही निवडणूक सहजरित्या जिंकली या निवडणुकीपासूनच केशवदादांना राजकारणाची वड निर्माण झाली.

सीआर ते आमदार पदापर्यंतचा केशवदादांचा राजकीय प्रवास संघर्षमय होता केशवदादांनी प्रस्थापितांच्या विरोधात सतत न्यायासाठी संघर्ष केला. सरपंच असताना त्यांनी रुई गावचा विकास केला केशवदादांनी १९९० मध्ये स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी



मुंडे साहेब यांची ओळख झाली त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९९२ ला भोगलवाडी जिल्हा परिषद सर्कल मधून भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर निवडणूक लढवली आणि विजयी झाले. १९९५ व १९९९ ला चौसाळा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली पण अल्पशा मताच्या फरकाने केशवदादांना पराभव पत्करावा लागला पण त्यांनी हार कधीच पत्करली नाही दुर्दम्य इच्छाशक्ती व जनतेच्या अलोट प्रेमाच्या जोरावर २००४ ला तिसऱ्यांदा चौसाळा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि विजयश्री खेचून आणण्याचा काम केशवदादांनी केले. तत्कालीन महाराष्ट्राचे कॅबिनेट ऊर्जा मंत्र्यांचा पराभव केशवदादांनी चौसाळा विधानसभा मतदारसंघातून केला.

श्रीमंताच्या विरोधातल्या लढाईत गरिबाचा विजय झाला होता 'एकच वादा केशव दादा' 'उत्तुंग मालिका,नित्य यशाची ओळख आपली जनतेला कमान कर्तुत्वाची,घाली गवसनी गगनाला' असेच कर्तुत्ववान असणारे मा.आमदार केशवदादा आंधळे साहेब यांच्या दूरदृष्टी संकल्पनेतून अप्पर कुंडलिका प्रकल्पाची निर्मिती झाली आहे.

वडवणी तालुका हा डोंगरपट्ट्यात येतो येथील,जमीन खडकाळ आहे शेतीला देण्यासाठी पाणी नसल्याने सर्व शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे येतील शेतकरी शेती न पिकल्यास कर्जबाजारी होतो आणि शेवटी आत्महत्या करून जीवन संपवतो हे दुष्टचक्र थांबवण्यासाठी माजी आमदार केशवदादांच्या दूरदृष्टी संकल्पनेतून अप्पर कुंडलिका प्रकल्पाची आदारशीला रचली गेली सोन्ना खोटा येथील, 'अप्पर कुंडलिका' प्रकल्पाला लोकनेते स्व.गोपीनाराव मुंडे साहेबांनी प्रशासकीय मंजुरी दिली या प्रकल्पाचे जनक म्हणून केशवदादांना ओळखले जाते काळ्या आईला हिरवा शालू नेसवण्याचा काम केशवदादांनी केले.

या प्रकल्पामुळे वडवणी तालुक्याच खऱ्या अर्थाने नंदनवन झाल आहे कारण हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली आली आहे. ऊस तोडणारे शेतकरी मजूर आज ऊस मालक बागायतदार झाले आहेत वडवणी करांना मार्च एप्रिल महिन्यात पाण्याची भीषण टंचाई निर्माण होत असायची गल्ली गल्ली मध्ये टँकरने पाणीपुरवठा केला जात असे परंतु आज या प्रकल्पामुळे वडवणीकरांची तहान भागवली जात आहे वडवणीकरांसाठी व शेतकऱ्यांनसाठी खऱ्या अर्थाने अप्पर कुंडलिका प्रकल्प हा आज वरदान ठरला आहे. भगीरथानी स्वर्गातून गंगा पृथ्वीवर आणली तसेच कार्य माजी आमदार केशवदादा आंधळे साहेबांनी अप्पर कुंडलिका प्रकल्प दामोदरवाडी वरून सोन्ना खोटा या ठिकाणी आणला.

"मी नाही पाहिलं सोनंनान पाहिलीत माणसं घडताना मातीतून उगवून सुद्धा आभाळाला भिडतांना'असेच व्यक्तिमत्व असणारे मा.आमदार केशवदादा आंधळे साहेब यांचा रविवार दि.६ एप्रिल २०२५ रोजी ७२ वा वाढदिवस होता दादांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

श्री.अशोक तांबडे, सहशिक्षक,
महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वडवणी



## 'फुले' चित्रपटातून जातीयवाद वाढवण्याचा प्रयत्न

### दिग्दर्शकांनी घेतली छगन भुजबळांची भेट

मुंबई । प्रतिनिधी

छावा चित्रपटानंतर आता अनंत महादेवन दिग्दर्शित फुले चित्रपटावरून सध्या चांगलाच वाद ओढावण्याची चिन्हे आहेत. या सिनेमाचा नुकताच टिझर प्रदर्शित झाला. या टिझरवर ब्राह्मण महासंघाचे नेते आनंद दवे यांनी फुले चित्रपट जातीय वाद वाढवणारा असं वक्तव्य केलं असून या चित्रपटातील काही सिनवर आक्षेप घेतला आहे. दरम्यान या चित्रपटाचे दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी फुले चित्रपटासाठी राज्याचे माजी मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेतली आहे. दरम्यान, या चित्रपटाचे दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी प्रत्येक सिनेमा तयार होताना त्याची सिनेमॅटिक लिबर्टी प्रत्येक दिग्दर्शक घेत असतो. अनेक पुस्तके आणि उपलब्ध साधनांचा अभ्यास करून हा चित्रपट बनवला असल्याचं ते म्हणालेत. या चित्रपटावरून सध्या राजकीय वर्तुळातून अनेक प्रतिक्रीया येत आहेत.

झी स्टुडिओज् प्रस्तुत, डान्सिंग शिवा फिल्म्स आणि किंग्जमेन प्रोडक्शन्स निर्मित 'फुले' या हिंदी चित्रपटाचा बहुप्रतिक्षित ट्रेलर नुकतंच प्रदर्शित झाला असून सोशल मीडियावर जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. ११एप्रिल २०२५रोजी प्रेक्षकांच्या भेटीला हा चित्रपट येणार आहे. दरम्यान अनंत दवेंच्या वक्तव्यावरून अनेकजण प्रतिक्रीया देत आहेत.

मुंबई येथे महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित फुले या चित्रपटाच्या दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते आणि राज्याचे माजी मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेतली.मुंबई येथे महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित फुले या चित्रपटाच्या दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी भेट घेतली.प्रत्येक चित्रपट तयार होताना सिनेमॅटिक लिबर्टी प्रत्येक दिग्दर्शक घेत असतो मात्र या चित्रपटात वस्तुस्थिती दाखवण्यात आली आहे. अनेक पुस्तकांचा आणि विविध उपलब्ध साधनांचा अभ्यास करूनच हा चित्रपट बनविण्यात आला असल्याचे मत चित्रपटाचे दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी व्यक्त केले .दिग्दर्शक अनंत महादेवन, निर्माते अनुया चौहान कुडेचा, निर्माते रितेश कुडेचा आणि सह निर्माते रोहन गोडांबे यांनी छगन भुजबळ यांची भेट घेतली.

## राक्षसभुवन भाविकांच्या स्वागतासाठी होतंय सज्ज

### नारायणगडच्या नारळी सप्ताहाची जय्यत तयारी

शिरूरकासार । प्रतिनिधी

धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायण गडाचा ७३ वा फिरतानारळी सप्ताह यावर्षी शिरूर कासार तालुक्यातील मौजे राक्षसभुवन थांबा येथे आयोजित करण्यात आला असून या भव्य दिव्य सोहळ्याची ग्रामस्थांकडून जय्यत तयारी चालली असून दोन दिवसावर आलेल्या या सप्ताह सोहळ्याच्या निमित्ताने राक्षसभुवननगरीमध्ये येणाऱ्या संत –महंत,भाविक –भक्तांच्या स्वागतासाठी सज्ज होताना दिसत आहेत.



महाराष्ट्रातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान, धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री.क्षेत्र नारायणगडाचा नावलौकिक दिवसेंदिवस वाढत चालला आहे. तत्कालीन श्री क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती वै.गुरुवर्य महंत महादेव महाराज यांच्या प्रेरणेतून सुरू करण्यात आलेला गडाचा फिरत्या नारळी सप्ताह बीड जिल्ह्यातील भाविक भक्तांसाठी भव्य महोत्सव झाला आहे. वै. महादेव महाराज यांनी फिरत्या नारळी सप्ताहाच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रूढी परंपरा, समाजात पसरलेली अंधश्रद्धा, अज्ञान, दूर करून समाजाला सन्मार्गाला लावण्यासाठी सप्ताहाचे आयोजन केले होते. या सप्ताहातच्या माध्यमातून संत विचाराचे मंथन होऊन समाज प्रबोधन, जनजागृती होईल आणि भरकटलेला समाज उन्नतीच्या दिशेने मार्गक्रमण करेल या उद्देशाने फिरत्या नारळी सप्ताहाचे रोपटे लावण्यात आले होते. आज या रोपटचाचे वटवृक्षांमध्ये रूपांतर होऊन अध्यात्माच्या पटलावर मोठा नावलौकिक झाला आहे. वै. महादेव महाराज यांच्या वैकुंठगमना उत्तराधिकारी म्हणून विद्यमान मठाधिपती हभप. महंत शिवाजी महाराज यांनी गुरु देवाने घालून दिलेल्या परंपरेला मोठ्या अट्टहासाने खतपाणी घालून सप्ताहाची व्यापकता वाढवली आहे.

श्री.क्षेत्र नारायणगडाचा ७३ व्या फिरत्या नारळी सप्ताहाच्या आयोजनाचे नारळ शिरूर कासार तालुक्यातील मौजे राक्षसभुवन (तांबा) येथील ग्रामस्थांनी उचललेले असून गुरुवार दि.१० एप्रिल पासून आरंभीत होणाऱ्या या सप्ताह सोहळ्याची राक्षसभुवन ग्रामस्थांच्या वतीने जय्यत तयारी चालू आहे. गेल्या वर्षभरापासून आज सप्ताह मोठ्या थाटात पार पडावा आणि आपल्या गावाचा नावलौकिक दूरवर जावा यासाठी सप्ताहाच्या पूर्वतयारीचे नियोजन चालू होते. या सप्ताहाच्या निमित्ताने राक्षसभुवन येथे येणाऱ्या मान्यवर संत–महंत, कथाकार, कीर्तनकार, संगीतकार, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आदींसह विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांसह भाविक–भक्तांच्या भक्तांच्या सुख सोयी, स्वागतासाठी राक्षसभुवनकर सज्ज झाले आहेत. नियोजित सप्ताह स्थळांवर भाविक भक्तांना कथा कीर्तन श्रवण करण्यासाठी भव्य स्वरूपामध्ये मंडप उभारण्यात आला आहे. त्याचबरोबर देव देवतांसाठी तात्पुरत्या स्वरूपाचे मंदिर (देवघर) करण्यात आले आहे तर आलेल्या भाविक भक्तांना भोजनाची व्यवस्था करण्यासाठी स्वयंपाक ग्रहाची उभारणी करण्यात आली आहे. गावामध्ये सर्वत्र साफसफाई करून जागोजागी पिण्याच्या पाण्यासह सांडपाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अगदी दोन दिवसांवर आलेल्या सप्ताह सोहळ्यासाठी प्रत्येक घर आणि घराचे अंगण सुसज्ज सजवले आहे. यामुळे राक्षसभवन या गावांमध्ये सप्ताह पूर्वीच मंगलमय वातावरण पाहायला मिळत आहे.

#### भाविकांच्या स्वागतासाठी शोभायात्रेचे आयोजन

सप्ताहाच्या पुष्पवृष्टीसाठी गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज, उत्तराधिकारी संभाजी महाराज आदींसह महाराष्ट्र भरातुन मान्यवर संत–महंत उपस्थिती लावणार आहेत. या मान्यवरांच्या स्वागतासाठी भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे यामध्ये विविध वाद्यांच्या पथकासह सांस्कृतिक देखावा सादरीकरणाचे पथके निमंत्रित करण्यात आले आहे.

#### हेलिकॉप्टर मधून होणार पुष्पवृष्टी

श्री.क्षेत्र नारायण गडाची मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्यासह संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना राक्षसभुवन मध्ये आणण्यासाठी हेलिकॉप्टर प्रवासाचे नियोजन करण्यात आले आहे. श्री.क्षेत्र नारायण गड ते राक्षस भुवन असा या हेलिकॉप्टरचा प्रवास होणार असून दहाच्या मंडपावर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात येणार सांगितले जात आहे.

## जाहिर नोटीस

**श्री.एन.एम.वाली. दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क.९२/२०२५
निशाणी क. १३/५

१) अश्विनी भ्र. शिवाजी अंडील वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा.ढगेवाडी ता.धारूर जि.बीड.
२) ज्ञानेश्वर पि. शिवाजी अंडील वय २२ वर्षे, धंदा शेती, रा. दमेवाडी ता.धारूर जि.बीड.
३) ऋषिकेश पि. शिवाजी अंडील वय २० वर्षे, धंदा शेती, रा. पारगाव ता.धारूर जि.बीड.
४) ज्योती भ्र. महादेव जाधव वय २५ वर्षे, धंदा घरकाम, रा. ढगेवाडी ता.धारूर जि.बीड.
५) सोजरवाई भ्र. बलभीम अंडील वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. पारगाव ता. धारूर जि. बीड.

) अर्जदार

**विरुद**

कोणीही नाही ) सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिरनामा/जाहिरनोटीस द्रवारे असे कळविण्यात येते की, ज्या पेक्षा मयत **शिवाजी पि. बलभीम अंडील** रा. पहाडी पारगाव ता. धारुर जि. बीड यांचे दिनांक ११/०५/२०२३ रोजी मौजे धारुर ता. धारूर जि. बीड येथे निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत.

मयत **शिवाजी पि. बलभीम अंडील** यांचे पश्चात शासकिय / निमशासक्रिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत **शिवाजी पि. बलभीम अंडील** यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करून वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरका दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावाव घेउन में न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज तारीख १३/०३/२०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.
प्रकरणात पुढील दिनांक २१/०४/२०२५

**क. लिपीक**

**हुकूमावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर**

## जाहिर नोटीस

श्री.एन.एम.वाली. दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क.२८/२०२५
निशाणी क. १५/५

१. सुमतीबाई प्र. रामराव देशपांडे वय ७५ वर्षे, धंदा घरकाम रा. कसबा विभाग ता.धारूर, जि.बीड.
२. गिरीष पि. रामराव देशपांडे वय ५० वर्षे, धंदा शेती रा. कसबा विभाग ता.धारुर, जि.बीड.

) अर्जदार

**विरुद**

कोणीही नाही ) सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिरनामा/जाहिर नोटीस द्रवारे असे कळविण्यात येते की, मयत **रामराव पि. दिगंबर देशपांडे** रा.कसबा विभाग धारुर ता.धारुर जि.बीड यांचे दिनांक ३०/०१/२०१९ रोजी कसबा विभाग धारुर ता. बारुर जि.बीड येथे निधन इसरलेले आहे. त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत.

मयत **रामराव पि. दिगंबर देशपांडे** यांचे पश्चात शासकिय/निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्रानी आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत **रामराव पि. दिगंबर देशपांडे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करून वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा व घेउन में न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज तारीख ०१/०४/२०२१५ रोजी आमचे सहीनिशी न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.
प्रकरणात पुढील दिनांक ०८/०५/२०२५

**क. लिपीक**

**हुकूमावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर**

## जाहिर नामा

**धारूर येथील श्रीमती ए.बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारूर**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११४/२०२५

**रेखा व इतर ४ वि. निरंक**

मयताचे नावे मयत **मेघराज पि. आबा कोठुळे उर्फ कोटुळे** हे दिनांक ०२.०८.२०२४ रोजी रा. हसनाबाद ता. धारूर जि.बीड येथे मृत्यू झालेला आहे.

त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. **१) रेखा भ्र. विक्रम कोठुळे,** वय ५३ वर्षे, धंदा घरकाम रा. हसनाबाद ता. धारूर जि. बीड. ह.मु. गोसावी वस्ती गल्ली क्र. १ हॅप्पी कॉलनी शीतल प्रोव्हीजन स्टोअर्स अर्जदार क्र. **२) प्रियंका पि. विक्रम कोठुळे,** वय ३४ वर्षे, धंदा गृहिणी रा. हसनाबाद ता. धारूर जि.बीड ह.मु. लक्ष्मीनारायण विला, कॅनॉल रोड माळवाडी कामगार सोसायटी गणपती माथा पुणे, अर्जदार क्र. **३) वैभव पि. विक्रम कोठुळे** वय ३१ वर्षे, धंदा नोकरी रा. हसनाबाद ता.धारूर जि. बीड ह.मु. लक्ष्मीनारायण विला, एस.एन. ३७, वारजे रामनगर पोलिस चौकी पुणे ४११०५८, अर्जदार क्र. **४) प्रणिता पि. विक्रम कोठुळे** वय २५ वर्षे, धंदा नोकरी रा. हसनाबाद ता. धारूर जि. बीड ह.मु. लक्ष्मीनारायण विला, वारजे पुणे सिटी पुणे, अर्जदार क्र. **५) जमुनाबाई भ्र. भाऊसाहेब इंगळे** वय ६६ वर्षे, धंदा घरकाम, रा. कळंबअंबा ता. केज जि. बीड अर्जदार क्र.१ ही मयताची सून असून अर्जदार क्र.२ ते ४ नातू व नाती आहेत तसेच अर्जदार क्र.५ ही मयताची मुलगी आहे. या नात्याने मयत मेघराज पि. आबा कोठुळे उर्फ कोटुळे या नात्याने त्यांना घर, जमिन व इतर मिळकतीला वारस आधारे अर्जदारांच्या नावाची नोंद करण्यासाठी व शासकीय, निमशासकीय व इतर आवश्यक गरजेकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत **मेघराज पि. आबा कोठुळे उर्फ कोटुळे** यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत **मेघराज पि. आबा कोठुळे उर्फ कोटुळे** यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
**पुढील तारीख : ०२/०५/२०२५**

**हुकूमावरुन**
**कनिष्ठ लिपिक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर**

**हुकूमावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर**

## जाहिर नामा

**धारूर येथील श्रीमती ए.बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारूर**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३९/२०२५

**अनुरत वि. निरंक**

मयताचे नावे मयत **नामे क्र.१ उत्तम पि. नामदेव शिंदे** हे दिनांक १९.०१.२०१५ रोजी मयत झाले असून **मयत नामे क्र. २ आश्रुबाई भ्र. उत्तम शिंदे** ह्या दिनांक ०२.०९.२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. मौजे मोरफळी ता.धारूर जि.बीड त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. **१ अनुरत पि. उत्तम शिंदे,** वय ५२ वर्षे, धंदा मजुरी रा. मोरफळी ता. धारूर जि. बीड. ह.मु. माळेवाडी ता. केज जि. बीड हे अर्जदार हा मयताचा मुलगा असून दोन्ही मयत हे अर्जदाराचे वडिल आणि आई असून या नात्याने मयत नामे क्र. १ उत्तम पि. नामदेव शिंदे व मयत नामे क्र. २ आश्रुबाई भ्र. उत्तम शिंदे या नात्याने त्यांना शासकीय, निमशासकीय व इतर आवश्यक गरजेकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार हा **मयत नामे क्र. १ उत्तम पि. नामदेव शिंदे व मयत नामे क्र. २ आश्रुबाई भ्र. उत्तम शिंदे** यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत नामे क्र. १ उत्तम पि. नामदेव शिंदे व मयत नामे क्र. २ आश्रुबाई भ्र. उत्तम शिंदे** यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७/०४/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
**पुढील तारीख : १०/०६/२०२५**

**हुकूमावरुन**
**कनिष्ठ लिपिक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर**

**हुकूमावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर**

# अंबाजोगाई तालुक्यात शासकीय कर्मचाऱ्यांकडून नागरिकांची होणारी अडवणूक थांबवा

## अ.भा.भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे उपजिल्हाधिकारी व तहसीलदारांना निवेदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यात विविध शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून सुरू असलेली नागरिकांची अडवणूक तात्काळ थांबवा अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी उपजिल्हाधिकारी व तहसीलदारांना सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनानुसार बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी उपजिल्हाधिकारी व तहसीलदारांना सोमवार, दि.७ एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंबाजोगाईतआसपासच्या तालुक्यातील पाल्य व पालक शिक्षणासाठी राहतात. इथे प्रशासकीय अप्रशासकीय कार्यालय सर्व शहरात आहेत. उपजिल्हाधिकारी, पंचायत समिती, तहसील, नगरपरिषद व इतर यापैकी काही कार्यालयामध्ये नागरिकांकडून पैसे घेऊन ही वेळेवर काम होत नाही. ग्रामीण व शहरी भागातला कोणत्या कार्यालयात एकदा गेला आणि काम झाले असे कधी होत नाही. सर्व प्रशासकीय व प्रशासकीय खात्यातील कर्मचाऱ्यांवर आपण अंकुश ठेवावा. तहसील कार्यालय व नगरपरिषद कार्यालयात काही तुरळक कर्मचारी कार्यरत असता बाकी बऱ्याच ठिकाणी कार्यालयीन कामात दिरंगाई दिसते क्षुल्लक कामालाही खूप वेळ लागतो. तहसील कार्यालयात तर ग्रामीण भागातील लोकांची मोठी हेळसांड होताना दिसते. फोन न उचलणे, उचलला तर कामा बद्दल व्यवस्थित न सांगणे या व इतर गोष्टी थांबायला पाहिजेत शासकीय अधिकारी हे जनतेचे नौकर आहेत. कोणत्याही नागरिकांचा फोन उचलणे व काम करणे ही त्यांची जबाबदारीच आहे, असे असताना ही या कर्मचाऱ्यांवर कोणाचाही अंकुश नाही असे दिसते. प्रत्येक नागरिक उपाजिल्हाधिकारी तहसीलदार, मुख्याधिकारी यांच्यापर्यंत पोहचू शकत नाही. यामुळे नागरिकांना नाहक त्रास होतो या आधीही आपणास निवेदनाद्वारे कळवले होते.





पाचशे रूपयांचा मुद्रांक (बॉण्ड) पेपर हा ५५०/५३० रूपयाला दिला जातो. यात नागरिकांची मोठी पिळवणूक होत आहे. आजही परिस्थिती जैसे थे आहे. यात बदल कधी होणार हा मोठा प्रश्न आहे. शेजारील जिल्ह्यामध्ये १०० रूपयांचा मुद्रांक (बॉण्ड) आज ही शासकीय कामकाजासाठी वापरणे सुरू आहे. फक्त आपल्या अंबाजोगाईत १०० रूपयांचा मुद्रांक (बॉण्ड) मिळत नाही, शासकीय कार्यालयात चालत नाही. तरी शंभर रूपयांचा मुद्रांक (बॉण्ड) शासकीय कार्यालयात वापरणे सुरूच ठेवण्यात यावे कारण, शैक्षणिक कार्यालयीन कामासाठी विद्यार्थ्यांना अडचणी येत आहेत. याबाबत आपण वरिष्ठांना बोलावे ही विनंती आहे. तसेच 'मी माझ्या पगारात अत्यंत समाधानी आहे.' या आशयाचा फलक (बोर्ड) प्रत्येक शासकीय व शासकीय कार्यालयातील विभागात लावण्याची गरज दिसते.

येत्या आठ दिवसांत आपण ते लावावेत. आपल्याला शक्य नसेल तर आमच्या संघटनेला फलक (बोर्ड) लावण्याची परवानगी द्यावी आम्ही स्वखर्चाने लावून देवूत. तरी साहेबांनी या प्रकरणी लक्ष देऊन समस्या सोडवाव्यात ही नम्र विनंती करून सहकार्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी तहसीलदार, तहसील कार्यालय अंबाजोगाई आणि मुख्याधिकारी, नगरपरिषद अंबाजोगाई यांना माहितीस्तव देण्यात आले आहे. सदरील निवेदनावर अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष ॲड.अरविंद मोटेगावकर, नानासाहेब गायकवाड, लहुजी शिंदे, इम्रान पठाण, ओमराजे चव्हाण, पांडुरंग देशमुख, धनंजय सुरवसे, विजयानंद सोळुंके यांच्यासह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शेतीमाल प्रक्रिया व पॅकेजिंग प्रकल्प उद्घाटन सोहळ्याला उपस्थित रहा

## बीड जिल्हा सहकारी बँकेचे माजी संचालक जेष्ठ नेते वसंत सानप यांचे आवाहन

रायमोहा । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी महाराष्ट्र शासन अटल अर्थ सहाय्य योजना अंतर्गत जिल्हा सहकारी बँकेचे माजी संचालक जेष्ठ नेते श्री वसंत भाऊ सानप यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष श्री अशोक सांगळे व संचालक यांनी वरील संस्था नोंदणी करून सदर संस्थेच्या वतीने शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतीमाल प्रक्रिया व पॅकेजिंग प्रकल्प सुरू करण्यासाठी अटल अर्थ सहाय्य योजनेअंतर्गत प्रस्ताव महाराष्ट्र राज्य विकास महामंडळ पुणे यांना सादर करून त्यास मंजुरी घेऊन कार्यान्वित करण्यासाठी उद्या दि. ०८/०४/२०२५ रोजी जिल्हा उपनिबंधक श्री जाधव साहेब व ह.भ.प विठ्ठल महाराज गहिनीनाथ गडकर व इतर मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ आयोजित करण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष व सचिव श्री भगवान आण्णा सानप यांच्या संकल्पनेतून रायमोहा येथे शेतीमाल प्रक्रिया व पॅकेजिंग प्रकल्प सुरू करण्यात आला आहे, तरी या सोहळ्याला शिरूर तालुक्यातील व रायमोहा परिसरातील शेतकरी व्यापारी बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा बँकेचे माजी संचालक श्री वसंत भाऊ सानप यांनी सांगितले की, या प्रकल्पाला शासनाकडून अनुदानही मिळवण्यासाठी वसंत भाऊ सानप यांनी प्रयत्न केले आहेत.

प्रकल्पामुळे युवकांना रोजगाराची संधी व शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनाला योग्य मूल्य मिळवण्यासाठी हा प्रकल्प वरदान ठरेल, हा प्रकल्प शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणा करणारा ठरेल. या उद्घाटनप्रसंगी या परिसरातील व्यापारी राजकीय नेते, शेतकरी नेते, सहकार क्षेत्रातील व कृषी क्षेत्रातील मान्यवर अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यावेळी शेतकऱ्यांना शेतीमाल प्रक्रिया व पॅकेजिंग तंत्रज्ञानाबद्दल मार्गदर्शन दिले जाईल. तरी शिरूर तालुक्यातील व परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी या सोहळ्याला उपस्थित राहावे हि विनंती.

# बेताल मंत्री माणिक कोकाटे यांनी कर्जमाफी नाही दिली तर महाराष्ट्रामध्ये फिरुन देणार नाही

## शिवसेना उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, शिवसेना तालुकाप्रमुख सोपान मोरे

शिरूर कासार । प्रतिनिधी

शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने कृषी मंत्री माणिक कोकाटे यांच्या प्रतिमेस जोडे मारले. आज शिरूर कासार शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री यांनी शेतकऱ्यांनविषयी केलेल्या बेताल व अपमानास्पद वक्तव्याबद्दल शिरूर कासार शहरातील जिजामाता चौकामध्ये शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व पदाधिकारी व शेतकरी बांधवांसोबत शिवसैनिक यांच्या वतीने कोकाटे यांच्या प्रतिमेस शेण फासून जोडे मारो आंदोलन करण्यात आले.



यावेळी बोलताना उपजिल्हाप्रमुख व तालुका प्रमुखांनी सांगितले की, महायुती शासनातील माणिक कोकाटे हा मंत्रीमंडळात ठेवण्यासाठी लायक नसुन वारंवार शेतकऱ्यांन बद्धल बेताल वक्तव्य करित आहे, यामुळे जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांची अवहेलना होत असुन त्याला ताबडतोब बडतर्फ केले पाहिजे, यापूढे कोकाटेनी असशी बेताल बडबड केल्यास शिवसैनिक त्याला फिरु देणार नाहीत असा इशारा देण्यात आला. यावेळी लालाभाई पठाण, राजेश कोकणे, संजय सानप, युवा सेनेचे तालुकाप्रमुख साईनाथ ढाकणे कलिम शेख, नामदेव आघाव, सारंग बडे, संतोष केदार यांच्यासह शिवसैनिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरणच्या दुर्लक्षाने घेतला शेतकऱ्याचा बळी!

## घरात विज प्रवाह उतरल्याने तरुण शेतकऱ्याचा करंट लागल्याने मृत्यू

गेवराई । प्रतिनिधी

ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड झाल्याने घरात विज प्रवाह उतरल्याने गेवराई तालुक्यातील एका तरुण शेतकऱ्याचा करंट लागल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली असून, महावितरणच्या दुर्लक्षामुळे सदरील शेतकऱ्याचा बळी गेल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. गणेश मोहन तळतकर (वय ३८, रा. बंगाली पिंपळा, ता. गेवराई, जि.बीड) असे या दुर्घटनेत मृत झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. गावातील एका ट्रान्सफॉर्मर (रोहित्र) यावरून काही घराला विज पुरवठा करण्यात येत आहे. मात्र, मागील काही दिवसापासून



ट्रान्सफॉर्मर मध्ये बिघाड झाल्याने या ट्रान्सफॉर्मर वरून होत असलेल्या साधारण आठ ते दहा घरात विज प्रवाह उतरत असल्याने येथील नागरिकांनी महावितरणकडे तक्रार करुन सदरील ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती केली नाही. सोमवारी आज सकाळी पुन्हा घरात विज प्रवाह उतरल्याने आठ ते दहा जणांना करंट लागला. परंतू यात गणेश तळतकर या तरुण शेतकऱ्याचा घरात करंट लागल्याने त्यास तात्काळ बीड जिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले असताना उपचार पूर्वीच सदरील शेतकऱ्याचा मृत्यू झाला.

शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाईक यांच्या ताब्यात देण्यात आला असून, महावितरणच्या हलगर्जी पणामुळे एका निष्पाप शेतकऱ्याचा बळी गेल्याचे बंगाली पिंपळ्यातील ग्रामस्थ संताप व्यक्त करत आहेत. मृत गणेश तळतकर यांच्या पाश्चात्य आई-वडिल, पत्नी, तीन मुली एक मुलगा असा परिवार आहे.

# ...तर तहानलेल्या नागरिकांसाठी रस्त्यावरील संघर्षाची तयारी : फड

## कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी सोडण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांची घेतली भेट; पाणी सोडण्याचे दिले आश्वासन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

उन्हाची तीव्रता प्रचंड प्रमाणात वाढली असून, एप्रिल महिना असल्याने सूर्य आग ओकत आहे. अशातच पाण्याची मोठी टंचाई जाणवू लागली आहे. त्याचबरोबर पशुपक्षी आणि जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे. कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात आले तर त्यामुळे काहीसा दिलासा मिळेल अशी अपेक्षा असल्याने पाणी नदीपात्रात सोडावे ही मागणी गेल्या महिनाभरापासून करण्यात येत आहे. त्यासंदर्भात निवेदने देऊन आणि पत्रव्यवहार करून प्रशासनाला कळवले आहे. येत्या १० तारखेपर्यंत पाणी सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी गावात तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. याच विषयाच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची सोमवारी भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.




राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची सोमवारी भेट घेतली. वाढती उष्णता आणि त्यामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई यासंदर्भात त्यांनी वास्तविकतेवर आधारित चर्चा केली. मागील अनेक दिवसांपासून कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात येत आहे. या प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात आले तर त्यामुळे कन्हेरवाडी, जिरेवाडी, जलालपूर, ब्रह्मवाडी, समता नगर, बँक कॉलनी, शंकर पार्वती नगर आदी भागातील पाण्याची टंचाई काही प्रमाणात दूर होण्यास मदत होणार आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन पाणी सोडावे अन्यथा नागरिकांच्या प्रश्नासाठी वेळप्रसंगी संघर्ष करावा लागला तरी तो करण्याची आपली तयारी असल्याची भूमिका राजेभाऊ फड यांनी मांडली. यावर जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी लवकरात लवकर कार्यवाही करू आणि कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्याचे आदेश देऊ असे आश्वासन दिले आहे.

# अखेर लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम पुर्णत्वाकडे

## स्मशानभूमीत सरण रचुन केलेल्या ठिय्या आंदोलनाचे यश : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील १२ ते १४ वर्षापुर्वी बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीचे ढासळलेल्या अवस्थेतील बांधकाम आणि उडुन गेलेले पत्रे यामुळे दुरावस्था झाली होती त्यामुळे पावसाळ्यात अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठी अडचण निर्माण होऊन मृतदेहाची हेळसांड होत होती. नविन स्मशानभूमी बांधण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सहकारी विक्रांत वाणी, कृष्णा वायभट, आरूण ढवळे यांनी ढासळलेल्या बांधकामावरच सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते. त्याची दखल घेत आ.संदिप क्षीरसागर यांनी जिल्हा वार्षिक (दहन/दहनभुमी) जनसुविधा विशेष अनुदान योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षाकरीता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत प्रशासकीय मान्यता दिली होती. आता काम पुर्णत्वाकडे गेले असुन नविन स्मशानभूमी पावसाळ्यात होणारी मृतदेहाची हेळसांड थांबणार असल्याने ग्रामस्थांनी याबद्दल समाधान व्यक्त केले असुन उर्वरित पेलव्हिक ब्लॉक, पाण्याचा हौद, संरक्षक भिंत आदी कामांसाठी पाठपुरावा करणार आहोत.




बीड जिल्ह्यातील १३९४ गावातील स्मशानभूमीची दुरावस्था असुन ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोयच नाही. त्यामुळे पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड याबरोबरच अंत्यसंस्कार रोखल्याने गावात वादविवाद होण्याच्या घटना घडत आहेत. काल दि.७ सोमवार रोजी धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण येथील भिल्ल समाजातील संजय नामदेव माळी यांचा मृतदेह धारूर तहसील कार्यालयासमोर ३ तास ठेवण्यात आला होता. यापुर्वीही केज तालुक्यातील सोनेसांगवी (सुर्डी) येथील ४ महिन्यात ३ मागासवर्गीय महिलांचा अंत्यसंस्कार रोखल्याने तहसील कार्यालयात मृतदेह आणुन ठेवला होता. तर गेवराई तालुक्यातील सुशी वडगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर मृतदेह ठेवण्यात आला होता तर बीड तालुक्यातील पालवण याठिकाणी अंत्यसंस्कार रोखल्याने भांडणे होऊन अट्रसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. गेल्या ३ वर्षांपासून आम्ही शासन दरबारी निवेदने तसेच लक्ष्यवेधी आंदोलनाद्वारे स्मशानभूमीची सोय करण्याची मागणी करत आहोत. परंतु प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांना याचे सोयरसुतक नसल्याचे दिसून येते, अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी बोलून दाखवली.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT